Estd. 1962

NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

# परिपत्रक

**विषय :- उन्हाळी सत्र २०२० मधील अंतिम वर्षातील / अंतिम सत्रातील सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षा मार्गदर्शक तत्वे व सूचना.**

कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्राच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१. अंतिम वर्ष अंतिम सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे मागील सत्र परीक्षा/परीक्षांचे काही विषय अनुत्तीर्ण असतील तर (Backlog) अशा विद्यार्थ्यांच्या त्या परीक्षा (अंतिम वर्ष/ अंतिम सत्र वगळून) संबंधित महाविद्यालयांनी/विद्यापीठ अधिविभागांनी घ्यावात. या सर्व प्रकारचे नियोजन महाविद्यालय/ विद्यापीठ अधिविभाग स्तरावर करण्यात येऊन त्यांचे गुण विद्यापीठाने कळविलेनुसार विद्यापीठाच्या संगणक प्रणालीतून सादर करण्यात यावेत.

२. अंतिम सत्रामधील/अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित विषयांच्या (Backlog Subjects) परीक्षांचे नियोजन दिनांक १ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० दरम्यान होतील. तसेच नियमित (Regular) परीक्षा दिनांक १० ऑक्टोबर, २०२० ते दिनांक २० ऑक्टोबर, २०२० दरम्यान होतील. या परीक्षा Online/Offline बहुपर्यायी प्रश्नाद्वारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरूपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एकतास) कालावधीच्या राहतील.

३. अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या नियमित (Regular), पुन:परीक्षार्थी (Repeater), अनुशेषित (Backlog) विद्यार्थ्यांच्या समसत्राच्या परीक्षा दिनांक १३ मार्च, २०२० पर्यत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर होतील. अंतिम पूर्व वर्षाच्या/सत्राच्या पुन:परीक्षार्थी (Repeater), विद्यार्थ्यांच्या परीक्षा या संपूर्ण १०० टक्के अभ्यासक्रमावर होतील. या परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरूपात आयोजित करण्यात येतील.

४. सदर महाविद्यालय/अधिविभाग स्तरावरील अनुशेष (Backlog) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. http: //www.unishivaji.ac.in/exam/final-year-exam-2020 या लिंक वर सदरची माहिती उपलब्ध राहील. महाविद्यालयांनी अनुशेष विद्यार्थ्यांचे (Backlog) परीक्षाचे वेळापत्रक PDF स्वरूपात समन्वयक, इंटरनेट कक्ष webmaster@unishivaji.ac.in यांचे कडे पाठविणेचे आहे (दूरध्वनी ०२३१-२६०९३६६). विद्यापीठाच्या इंटरनेट कक्षाकडून महाविद्यालयाचे वेळापत्रक जिल्हानिहाय कोष्टक करून महाविद्यालयानुसार संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

महाविद्यालयांनी सदरचे वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्याची खात्री करावी. तसेच परिक्षेचे वेळापत्रक सर्व संबंधित विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावावे.

५. जे विद्यार्थी Offline चा पर्याय निवडतील त्यांच्यासाठी OMR Sheet चा वापर करून Offline पध्दतीच्या परीक्षांचे आयोजन हे महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, आरोग्य मंत्रालय यांनी कोव्हिड-१९ बाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सूरक्षित अंतर ठेवून, विद्यार्थ्यांची सुरक्षा व परीक्षांचे पावित्र्य राखून महाविद्यालये - संस्थांमध्ये घेण्यात येतील.

६. अपरिहार्य कारणास्तव जे विद्यार्थी अंतिम वर्ष/अंतिम सत्राची नियमित (Regular) अथवा अनुशेषित (Backlog) विषयांची परीक्षा देवू शकणार नाहीत. त्याची परीक्षा व वेळापत्रक विद्यापीठाकडून नंतर जाहीर करण्यात येईल.

७. Online परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला सॉफ्टवेअरमार्फत आपोआप वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही आपोआप सेव्ह होऊन खंड पडला तेथून परीक्षा पुन्हा सुरू होईल.

८. Online परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी नमुना प्रश्नांवर आधारित सराव परीक्षाचे आयोजन (Mock Test / Practice Test) मुख्य परीक्षेपूर्वी करण्यात येईल.

९. दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील.

१०. Online व Offline या दोन्ही पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न(MCQ) परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

११. महाविद्यालय/अधिविभागामध्ये परीक्षा कर्तव्य पार पाडताना परीक्षेची गोपनीयता, पावित्र्यता जपणे आवश्यक आहे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात व दक्षता घ्यावी.

१२. उपरोक्त परीक्षांशी संबंधित प्रात्यक्षिक/प्रबंध/प्रकल्प/मौखिक परीक्षा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष न बोलविता ऑनलाईन स्वरूपात घेण्यात याव्यात. तसेच या परीक्षा दि. १५ सप्टेंबर, २०२० पासून आयोजित करून त्याचे गुण विद्यापीठाच्या उपलब्ध असलेल्या संगणक प्रणालीमध्ये ०१ ऑक्टोबर २०२० पर्यत भरून तसा अहवाल गुणयादयांसहित संबंधित ऑन परीक्षा विभागाकडे सादर करण्यात यावा.

१३. अंतिम वर्षाच्या उपरोक्तप्रमाणे घेण्यात येणा-या सर्व परीक्षांचे निकाल शासन निर्देशाप्रमाणे विहित मुदतीत जाहिर करणेसाठी सर्व संबंधित घटकांचे सहकार्य घेण्यात यावे.

१४. प्रत्यक्ष परीक्षेदरम्यान येणा-या अडचणीचे निवारण करण्याकरिता समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून त्याचा तपशील स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

१५. प्रात्यक्षिक परीक्षा/viva voce विद्यार्थ्यांना थेट महाविद्यालयात न बोलवता तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा घेण्याची मुभा संबंधित अधिविभागप्रमुख/संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना देण्यात आलेली आहे. प्रात्यक्षिक परीक्षा/viva voce इ.घेण्यासाठी Skype अथवा अन्य Meeting Apps अशा तत्सम पर्यायाचा वापर करण्यात यावा.

१६. दूरशिक्षण अभ्यास केंद्राकडे प्रवेशित विद्यार्थ्यांची अंतिम वर्ष/अंतिम सत्राची परीक्षा Online/Offline पध्दतीने होईल तसेच अनुत्तीर्ण, अनुशेष विषयांची परीक्षा संबंधित महाविद्यालयामार्फत/ Online/ Offline पध्दतीने आयोजित करण्यात येईल.

१७. P.G.Diploma, Diploma Certificate पध्दती इ. च्या अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या परीक्षांचे आयोजन विद्यापीठ प्रणालीमधून केले जाईल व अनुतीर्ण/अनुशेष विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन संबंधित अधिविभाग/महाविद्यालयामार्फत केले जाईल. रविवार दि. ११ ऑक्टोबर २०२० रोजी राज्यसेवा पूर्व परीक्षा व महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा होणार असल्या कारणाने सदर दिवशी व राष्ट्रीय सुट्टीच्या दिवशी कोणत्याही परीक्षांचे आयोजन करण्यात येवू नये.

१८. कोव्हिड-१९ या साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे वरील सर्व तरतुदी या फक्त शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठीच असतील.

मा.अधिविभाग प्रमुख,मा.प्राचार्य/संचालक यांना विनंती करण्यात येते की, जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना Online पध्दतीने परीक्षा देण्यासाठी मार्गदर्शन/प्रोत्साहन दयावे. वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या अधिविभागातील, आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

( गजानन पळसे)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र..: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/**305
**दिनांकः–16 सप्टेंबर, 2020**

प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी